**<u>नियमित दिवाणी दावा क्र.४१०/२०१५ मधील निशाणी क्रमांक ७८ खालील आदेश</u>**

**निवृत्ती रामचंद्र ताके व इतर ... वादी.**

**<u>विरुध्द</u>**

**येनुबाई बबन ताके व इतर ... प्रतिवादी.**

वादीने प्रस्तुतच्या अर्जात दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती पैकी १ हे. ५८.५४ आर. क्षेत्र नागपुर – मुंबई शिघ्रसंचार द्रृतगती महामार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) साठी भुसंपादीत झाले आहे. ते क्षेत्र दावा मिळती मधुन कमी करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याचे राहुन गेले आहे. म्हणुन दावा मिळकतीचे वर्णन मध्ये एकुण क्षेत्र ३ हे. ८५ आर. क्षेत्र मधुन १ हे. ५८.५४ आर. कमी करुन राहिलेले ०२ हे. ०८.४६ आर क्षेत्राची दुरुस्ती करण्यास परवाणगी मिळण्यासाठी वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादींनी सदर अर्जास हरकत घेतली असुन दुरुस्तीस जास्ती जास्त कॉस्ट करण्याची विनंती केली आहे.

२. वादी व प्रतिवादी यांची कथने आणि उभयपक्षाच्या युक्तीवादावरुन अर्जाच्या निष्कर्षाकरीता खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. खाली दिलेल्या कारणांस्तव यांचे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | उभय पक्षामध्ये वादाच्या मुख्य मुददयाचा गुणांवगुणावर निष्कर्ष देण्याकरीता प्रस्तुत दुरुस्ती आवश्यक आहे काय ? | ...होय. |
| २. | आदेश काय ? | आदेश मंजुर. |

३. वादी यांनी प्रस्तुत दावा हा कायदयाप्रमाणे वाटप होऊन त्यांचा हिस्याचे

विभक्त ताबा मिळण्या करीता दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तुत दाव्यात वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णना मध्ये एकुण क्षेत्र ३ हे. ८५ आर. क्षेत्र मधुन १ हे. ५८.५४ आर. कमी करुन राहिलेले ०२ हे. ०८.४६ आर क्षेत्राची दुरुस्ती करण्याची मागणी केलेला आहे. दोन्ही पक्षास ही बाब मान्य आहे की, दावा मिळकती पैकी १ हे. ५८.५४ आर. क्षेत्र नागपुर – मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) साठी भुसंपादीत झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी अर्जास हरकत घेतलेली असली तरी उभय पक्षामध्ये जो वादातील प्रश्न आहे त्याचा गुणांवगुणावर निर्णय देण्याकरीता प्रस्तुत दुरुस्ती ही आवश्यक आहे. दाव्यामध्ये वाद मुद्दे निश्चित केलेले नसुन आज पावेतो कुठल्याही पक्षाने पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती करण्यास वादी यांना मंजुरी दिल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार नाही. तसेच दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याचे स्वरुपात कोणतेही बदल होणार नाही. म्हणुन या मुद्दयाकरीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षाकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने निर्धारीत वेळेत दुरुस्ती करावी.

27/11/21

(श्रीमती आर. एन. मर्के)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
वैजापुर.

दिनांक – २७/११/२०२१.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Prashantkumar N. Waghamare.<br>Stenographer |
| Court | : | Smt. R. N. Merck.<br>Civil Judge (S.D.), Vaijapur. |
| Date | : | 27.11.2021. |
| Order signed by<br>the presiding officer on | : | 27.11.2021. |
| Order uploaded on | : | 27.11.2021. |